**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 20 मि.**

**दिनांक:09.10.2023** **वार: सोमवार**

---

ठळक बातम्या

- वायु दलाच्या 91 व्या वर्धापन दिनी नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण
- तंत्रज्ञानाचा वापर केल्यास न्यायदानावरचा भार कमी होईल–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सल्ला
- मराठी भाषा जगवण्याकरता लोकरेटा आवश्यक असल्याचं ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांचं मत
- आशियाई क्रीडा स्पर्धेचा समारोप; 107 पदकं जिंकत भारताची आजवरची सर्वोत्तम कामगिरी आणि
- पन्नास षटकांच्या विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताने उघडले विजयाचे खाते.

---

**वायुदल दिन**

भारतीय वायु दलाचा 91वा वर्धापन दिन काल देशभरात उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त काल उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथं वायु दलाचं विशेष संचलन आयोजित करण्यात आलं होतं. यावेळी राफेल, मिग 21, तेजस या लढाऊ विमानांसह वायु दलाच्या हेलिकॉप्टरचीही चित्तथरारक प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. वायु दल प्रमुख एअर चीफ मार्शल व्ही.आर.चौधरी यांच्या हस्ते वायु दलाच्या नवीन बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण करण्यात आलं. 91 व्या वर्धापनदिनानिमीत्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी वायु दलाचे सर्व जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या. यानिमित्तानं मुंबईत आयोजित केलेल्या समारंभाला राज्यपाल रमेश बैस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

देशभरात विविध ठिकाणी वायु दल दिनानिमित्त अनेकविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. पुण्यात डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीनं विद्यार्थ्यांसाठी एरो मॉडेलिंगची प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली.

**मंडणगड न्यायालय**

प्रलंबित खटल्यांचं आव्हान सध्या सगळ्यात मोठं असून तंत्रज्ञानाचा वापर केल्यास न्यायदानावरचा भार कमी करता येऊ शकतो, असं मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते आणि फडणवीस यांच्या उपस्थितीत रत्नागिरी जिल्ह्यातल्या मंडणगड इथं दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालयाचं उद्घाटन काल करण्यात आलं, त्यावेळी फडणवीस बोलत होते.

आतापर्यंत मंडणगडच्या नागरिकांना दापोलीतल्या न्यायालयात जावं लागत होतं. आता इथंच न्यायालय सुरू झाल्यामुळं न्याय त्यांच्या दारी आला आहे, अशी भावना न्यायमूर्ती भूषण गवई यांनी यावेळी व्यक्त केली. न्यायालयाच्या नवीन इमारतीचा कोनशिला समारंभही त्यांच्या उपस्थितीत झाला. मंडणगड तालुक्यातल्या आंबडवे या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ गावी त्यांचं भव्य स्मारक उभं करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचंही फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**<u>उपमुख्यमंत्री फडणवीस</u>**

देशाच्या विकासात तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून सर्वच क्षेत्रात विकास साधला जात असताना, युवा पिढीचं योगदान दुर्लक्षित करून चालणार नाही, असं मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. ते काल भंडारा इथं वैनगंगा पांगोली खासदार सांस्कृतिक महोत्सवात बोलत होते. साकोली इथं नवीन नाट्यगृह तयार करण्यासाठी सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जाईल, जिल्हाधिकाऱ्यांनी त्यासाठी जागा शोधावी,असंही फडणवीस यांनी यावेळी जाहीर केलं.

**<u>इंडिया मेला</u>**

भारत आणि जपान यांच्यातील कला आणि खाद्य संस्कृतीला चालना देण्यासाठी जपानमधल्या कोबे शहरात ‘इंडिया मेला’ हे प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. याचं उद्घाटन काल राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत झालं. ‘इंडिया मेला’च्या निमित्ताने भारत आणि जपान या दोन्ही देशांमधील सौहार्द वाढेल; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वात भारत आणि जपानमधील मैत्री अधिक दृढ होईल, असा विश्वास मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केला.

**<u>आयुष मंत्रालय</u>**

केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाची तिसरी विभागीय बैठक आज मुंबईत होणार आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्य शासनाच्या आरोग्य विभागाअंतर्गत आयुष विभागाने या बैठकीचं आयोजन केलं आहे. केंद्रीय आयुष मंत्री सर्बानंद सोनोवाल, केंद्रीय आयुष राज्यमंत्री मुंजपारा महेंद्रभाई कालुभाई, राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. तसंच गुजरात, राजस्थान, गोवा या राज्यांचे आणि दादरा नगर हवेली, दीव दमण, अंदमान निकोबार इथले मंत्री, वरिष्ठ आयुष अधिकारीही यात सहभागी होणार आहेत.

**<u>या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात...</u>**

**रंगनाथपठारे**

मराठी भाषेची अवस्था सध्या वाईट असून लोकशाही व्यवस्थेत मराठी भाषा जगवण्याकरता लोकांनी दबाव निर्माण केला पाहिजे; तरच मराठीचं स्थान अबाधित राहील असं मत ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. सेंटर फॉर पॉलिसी अँड गव्हर्नन्स या संस्थेच्या वतीनं मराठी भाषा धोरण आणि अंमलबजावणी या विषयावरच्या चर्चासत्रात ते बोलत होते. एक दिवसाच्या या चर्चासत्रात मराठी भाषा तज्ञ, साहित्यिकांनी सहभाग घेतला. प्रशासकीय आणि न्यायालयीन मराठी भाषा, मराठी माध्यमातून शालेय आणि उच्च शिक्षण, मराठी भाषा संशोधन आणि ग्रंथ प्रसार या विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. या चर्चासत्रानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना रंगनाथ पठारे म्हणाले...

आज परिस्थिती मराठीच्या दृष्टीने अत्यंत वाईट आहे. आणि मी असं सांगेन की याला आपण फक्त शासनावर जी जबाबदारी ढकलतो ते बरोबर नाही. एक भाषिक समाज म्हणून आपली जबाबदारी सगळ्यात मोठी आहे. कारण शेवटी शासन हे या भाषिक समाजाचा भाग असतं. प्रशासनही भाग असतं. त्यामुळे एक लोकशाही व्यवस्थेमध्ये ज्या प्रकारचा दाब हा लोकांनी तयार करायचा असतो. आणि तो तयार करण्यासाठी लोकजागृती करणं हा नुसता भाषेच्या प्रेमाचा प्रश्न नाही. हा व्यक्तींच्या आणि व्यक्तींच्या समूहाच्या स्वार्थाचा प्रश्न आहे. तुम्हाला जर ज्ञान मिळवायचं असेल, तर मातृभाषे इतकं सुलभ साधन दुसरं कोणतंही नाही.

**स्मृतिशिल्प**

रत्नागिरी जिल्हा न्यायालयाच्या आवारात उभारण्यात आलेल्या रवींद्रनाथ टागोर यांच्या स्मृतिशिल्पाचं उद्घाटन शनिवारी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते झालं. या स्मृतिशिल्पाविषयी अधिक माहिती ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून...

नोबेलविजेत्या 'गीतांजली'सह अनेक उत्तम साहित्यरचना केलेल्या गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचं रत्नागिरीशीही नातं आहे. ज्येष्ठ बंधू सत्येंद्रनाथ 1886-87 या कालावधीत रत्नागिरीचे जिल्हा न्यायाधीश असताना रवींद्रनाथ त्यांच्याकडे काही काळ वास्तव्याला होते. न्यायाधीशांच्या निवासस्थानाच्या आवारातल्या आसनावर बसून समोरच्या अथांग सागराच्या साक्षीने रवींद्रनाथांनी अनेक काव्यरचना केल्या. टागोरांच्या साहित्याचे अभ्यासक पुखराज बोरा 2009 साली रत्नागिरीत जिल्हा न्यायाधीश म्हणून आले, तेव्हा टागोरांचं उचित स्मारक इथे उभारण्याची संकल्पना त्यांनी मांडली. जिल्हा वकील संघासह न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सक्रिय पाठिंब्यामुळे ती संकल्पना आता प्रत्यक्षात आली आहे. 'गीतांजली'मधली प्रार्थनेच्या आशयाची बंगाली कविता, तिचा मराठी अनुवाद आणि रवींद्रनाथांची प्रतिमा या स्मृतिशिल्पात आहे. कोल्हापूरचे मूर्तिकार किशोर पुरेकर आणि आर्किटेक्ट राहुल देसाई यांनी साकारलेलं हे प्रेरक ब्राँझ शिल्प पूर्व आणि पश्चिम भारताचे सांस्कृतिक बंध दृढ करणारं ठरेल. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.

**रुग्णालय पाहणी**

वर्ध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी काल जिल्हा सामान्य रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी रुग्णांची विचारपूस करुन आरोग्य पत्रिकेची पाहणी केली आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

**तलाव कायापालट**

सोलापूरमधल्या ब्रिटीशकालीन होटगी तलावाचा आता कायापालट होणार आहे. पर्यटन महामंडळाच्या वतीनं त्या ठिकाणी विविध विकासकामं करण्यासाठी जवळपास 5 कोटी रुपयांच्या कामांना मंजूरी मिळाली आहे. त्यामुळं पर्यटन आणि मनोरंजनाबरोबरच आता या तलावात नौकाविहाराचा आनंदही लुटता येणार आहे.

**सिक्कीम शहीद**

सिक्कीममध्ये मंगळवारी झालेल्या ढगफुटीमुळे तिस्ता नदीला पूर येऊन लष्कराची छावणी वाहून गेली. यात मूळचे बीड जिल्ह्यातले जवान पांडुरंग तावरे बेपत्ता झाले होते. तीन दिवसांनंतर त्यांचं पार्थिव शरीर हाती लागलं. त्यांच्या पार्थिव देहावर आज काकडहिरा या त्यांच्या मूळ गावी लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती तहसीलदार बालाजी चितळे यांनी दिली आहे.

**आशियाई क्रीडा**

चीनमध्ये हांगचौ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेचा काल समारोप झाला. भारताचा हॉकीपटू पी आर श्रीजेशनं समारोप सोहळ्यात भारतीय पथकाचं नेतृत्व केलं. या स्पर्धेत 28 सुवर्ण, 38 रौप्य आणि 41 कास्य अशी एकंदर 107 पदकं जिंकत भारतानं पदकतालिकेत चौथं स्थान पटकावलं. आशियाई क्रीडा स्पर्धेत शंभरहून अधिक पदकांची कमाई करणाऱ्या सर्व भारतीय खेळाडूंचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी अभिनंदन केलं आहे.

**विश्व-करंडक**

आयसीसी पुरुष विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतानं आपल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा काल चेन्नई इथं सहा गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियानं विजयासाठी ठेवलेलं 200 धावांचं आव्हान भारतानं त्रेचाळीसाव्या षटकात चार गड्यांच्या बदल्यात पार केलं. विराट कोहली आणि के एल राहुल यांची 165 धावांची भागिदारी निर्णायक ठरली. रविंद्र जडेजानं पाहुण्यांचे तीन गडी बाद केले.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र सूर्यप्रकाशयुक्त कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**